आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२४ एप्रिल २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेत सर्वपक्षीय बैठक सुरू
- हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा इशारा
- काश्मिरमध्ये अडकलेल्या पर्यटकांना विशेष विमानानं आणण्यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न सुरू

**आणि**

- राष्ट्रीय पंचायतराज दिनानिमित्त गोंदिया जिल्ह्यातल्या डव्वा ग्रामपंचायतीला प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं बोलावलेली सर्वपक्षीय बैठक नवी दिल्लीत संसद भवन संकुलात सुरू आहे. बैठकीच्या सुरुवातीला २ मिनिटे मौन पाळून मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह बैठकीच्या अध्यक्षस्थानी असून, गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारमण, भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा, काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, द्रमुकचे तिरुची शिवा, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रफुल्ल पटेल, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, समाजवादी पार्टीचे राम गोपाल यादव, आम आदमी पक्षाचे संजय सिंह, राष्ट्रीय जनता दलाचे प्रेमचंद गुप्ता, वायएसआर काँग्रेसचे पी. व्ही. मिधुन रेड्डी, तृणमूल काँग्रेसचे सुदीप बंदोपाध्याय इत्यादी नेते या बैठकीला उपस्थित आहेत.

श्रीनगरमध्येही आज सर्वपक्षीय बैठक झाली. या बैठकीत या हल्ल्याचा एकमुखी निषेध करण्यात आला आणि हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी सरकार करत असलेल्या सर्व प्रयत्नांना पाठिंबा देण्याचा ठराव एकमतानं मंजूर झाला.

**<><><><><>**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवनात जाऊन भेट घेतली. जयशंकर यांनी निवडक देशांच्या राजदूतांशी देखील आज या संदर्भात चर्चा केली. जर्मनी, जपान, पोलंड, युके आणि रशिया या देशांचे राजदूत यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना असतील तिथून शोधून काढून, त्यांनी कल्पना केली नसेल अशी शिक्षा करू, असा निर्धार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. ते आज बिहारमधे मधुबनी इथं राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त आयोजित जाहीर सभेत बोलत होते.

**होल्ड - प्रधानमंत्री…**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला, या दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना प्रधानमंत्र्यांनी काही क्षण मौन पाळून आदरांजली वाहिली. दहशतवादाचे बळी ठरलेल्यांना न्याय मिळावा यासाठी आवश्यक तो प्रयत्न केला जाईल. संपूर्ण देश या निर्धारामागं एकदिलानं ठामपणे उभा आहे. मानवतेवर विश्वास असणारे सर्वजण आपल्यासोबत आहेत, असं प्रधानमंत्री म्हणाले.

या वेळी मोदी यांनी १३ हजार ५०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण केलं. यात जयनगर ते पाटणा दरम्यान धावणाऱ्या नमो भारत रॅपिड रेल्वे, आणि सहरसा ते मुंबईत लोकमान्य टिळक टर्मिनस पर्यंत धावणाऱ्या अमृत भारत एक्सप्रेसचा समावेश आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या १५ लाख नव्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते स्वीकृती पत्रं प्रदान करण्यात आली. या योजनेच्या १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ताही त्यांनी जारी केला.

<><><><><>

पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ राज्यात विविध ठिकाणी बंद पुकारला आहे.

या हल्ल्यात डोंबिवलीतल्या तीन रहिवाश्यांचा मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ शहरातल्या सर्व राजकीय पक्षांनी आज डोंबिवली बंदचं आवाहन केलं होत.  या आवाहनाला प्रतिसाद म्हणून डोंबिवलीत आज  कडक बंद पाळण्यात आला.

बीड जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त उद्या होणारा भीमसंगीताचा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. अमरावती जिल्ह्यात विविध संघटनांनी उद्या जिल्हा बंदचं आवाहन केलं आहे.

<><><><><>

जम्मू काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ल्यानंतर तिथं अडकलेल्या राज्यातल्या पर्यटकांची पहिली तुकडी विशेष विमानानं आज पहाटे साडेतीन वाजता मुंबई विमानतळावर सुखरूप पोहचली.

१८४ पर्यटकांना मुंबईला घेऊन जाणारं दुसरं विमानही श्रीनगरहून मुंबईकडे रवाना झालं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रीनगर इथं या पर्यटकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला आणि सुरक्षित प्रवासासाठी या सर्वांना आश्वस्त करून निरोप दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्याकडून आज काश्मीरमधल्या जखमी पर्यटकांच्या उपचार आणि वैद्यकीय व्यवस्थेचा आढावा घेतला. गिरीश महाजन यांनी काश्मीरमध्ये लष्करी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या महाराष्ट्रातल्या पर्यटकांची भेट घेतली, त्यावेळी त्यांनी व्हिडीओ कॉलवरून मुख्यमंत्र्यांचा या पर्यटकांशी संवाद घडवून आणला. या सर्वांवर उपचार करणाऱ्या लष्करी डॉक्टरांचेही मुख्यमंत्र्यांनी आभार मानले.

<><><><><>

राष्ट्रीय पंचायतराज दिनानिमित्त उत्कृष्ट कामगिरीबद्दल गोंदिया जिल्ह्यातल्या डव्वा ग्रामपंचायतीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज हवामान कृषी पंचायत पुरस्कार प्रदान करण्यात आला. बिहारमध्ये मधुबनी इथे पंचायती राज मंत्रालयाकडून हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. हा पुरस्कार सरपंच योगेश्वरी चौधरी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. मानचिन्ह, १ कोटी रुपये रोख आणि प्रमाणपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार कर्नाटकातल्या हसन जिल्ह्यातल्या बिरदहळ्ळी ग्रामपंचायतीनं मिळवला आहे. तर तिसरा क्रमांक बिहारमधल्या समस्तीपूर जिल्ह्यातल्या मोतीपूर ग्रामपंचायतीला मिळाला आहे.

**<><><><><>**

भारतातल्या पोलाद उद्योगात शून्य आयात करून फक्त निर्यातीवर लक्ष केंद्रित करण्याची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. मुंबईत बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये आज आयोजित करण्यात आलेल्या इंडिया स्टील २०२५च्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन दूरस्थ पद्धतीनं केल्यानंतर ते बोलत होते. राष्ट्रीय पोलाद धोरणांतर्गत निर्धारित केलेल्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांवर त्यांनी यावेळी प्रकाश टाकला. २०३० पर्यंत देशातलं पोलाद उत्पादन ३० कोटी टनांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट असल्यांच त्यांनी सांगितलं…

**होल्ड... बाईट - नरेंद्र मोदी**

भारत सध्या अडीच कोटी टन पोलाद निर्यात करण्याचं उद्दिष्ट ठेवून काम करत असून २०४७ पर्यंत पोलाद उत्पादन क्षमता ५० कोटी टनांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट असल्याचंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि राजस्थान रॉयल्स यांचा सामना होत आहे. बंगळुरु इथं थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

राजस्थाननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

पुरुषांमधे प्रोस्टेट आणि जननेंद्रियांच्या कर्करोगाबद्दल जागरूकता आणण्यासाठी मुंबईच्या टाटा स्मारक केंद्रानं मेनकॅन हा उपक्रम सुरु केला आहे. यात कर्करोगाची लक्षणं, नियमित तपासण्याचं आणि लौकर निदान होण्याचं महत्त्व, तसंच प्रभावी उपचार याबद्दल माहिती देण्यात येत आहे. पुरुषांना याबाबत माहिती आणि मानसिक आधार मिळावा याकरता वेगळी हेल्पलाईनही सुरु केली आहे.

<><><><><>

राज्यात  अमरावती, कोल्हापूर, नाशिक आणि सोलापूर इथं प्रादेशिक अवयव प्रत्यारोपण केंद्रांची स्थापना होणार आहे. सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज मुंबईत ही माहिती दिली. अवयवदानाच्या प्रक्रियेत पारदर्शकता आल्यानं राज्यात अवयवदान आणि प्रत्यारोपण प्रक्रियेला गती मिळत आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ, तर मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी, तसंच कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किंचित वाढ झाली.

राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान ब्रम्हपुरी इथं ४५ पूर्णांक ६ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा,आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//